ePaper

| वर्ष - 6 | अंक - 289 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | शनिवार दि. 4 फेब्रुवारी 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## जगातील सर्वांत श्रीमंत व्यक्तींच्या यादीत अदानी टॉप 20मधून बाहेर




### आतील पानांत

- कसबा पोटनिवडणूक : अभिजित बिचुकलेंची एन्ट्री
- भागवत नका होऊ,भागवत कथा सांगत राहा !
- मराठा समाजाला मोठा धक्का!


# चिंचवडमध्ये ‘नाशिक पॅटर्न’!

## » राष्ट्रवादी काँग्रेस ‘मास्टर स्ट्रोक’च्या तयारीत : फायदा कुणाचा भाजपाचा की अपक्षाचा?

| पिंपरी | महाईन्यूज | विशेष प्रतिनिधी |

**पिंपरी-चिंचवड शहराचे राजकीय भवितव्य निश्चित करणाऱ्या चिंचवड विधानसभा पोटनिवडणुकीत ‘नाशिक पॅटर्न’ पहायला मिळणार आहे. या निवडणुकीत भाजपा+बाळासाहेबांची शिवसेना महायुतीचा उमदेवार विरुद्ध महाविकास आघाडीचा उमेदवार अशी थेट लढत होणार नाही. महाविकास आघाडीकडून एकूण ९ प्रमुख इच्छुकांपैकी मोठी राजकीय महत्त्वाकांक्षा असलेला उमेदवार ‘अपक्ष’ रिंगणात उतरणार असून, त्याला राष्ट्रवादी, शिवसेना ठाकरे गटाची मदत होणार आहे. यामध्ये महाविकास आघाडीच्या अधिकृत उमेदवाराचा ‘गेम’ होईल, अशी चर्चा ‘ग्राऊंड लेव्हल’ ला ऐकायला मिळत आहे.**






संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागलेल्या नाशिक पदवीधर मतदारसंघात महाविकास आघाडीच्या उमेदवार शुभांगी पाटील यांचा पराभव झाला. अपक्ष उमेदवार आणि काँग्रेसचे बंडखोर नेते सत्यजित तांबे यांनी बाजी मारली. तांबे यांना भाजपाची मदत झाली असे सांगीतले जाते. मात्र, तांबे यांना राष्ट्रवादी काँग्रेसने मदत केली, असे जाहीर विधान दस्तुरखुद्द विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी केले. त्यामुळे खळबळ उडाली. काँग्रेस आणि शिवसेना ठाकरे गटात अस्वस्थता पसरली आहे.

विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी ‘राष्ट्रवादीने सत्यजित तांबे यांना निवडणूक जिंकण्यासाठी मदत केली,’ अशा आशयाचा खुलासा केला. अजित पवार यांच्या या विधानानंतर काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी आक्रमक भूमिका घेतली होती. महाविकास आघाडीच्या बैठकीत याबाबत सविस्तर चर्चा होईल, असे नाना पटोले म्हणाले होते.

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी प्रसारमाध्यमांच्यासमोर या विधानावर प्रकाश टाकला. “महाविकास आघाडीच्या वतीने आमच्या ज्या उमेदवार होत्या त्यांचे काम राष्ट्रवादी पक्षाने केले. मी अजित पवार यांचे विधान ऐकलेले नाही. नाशिक पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत लोकांमध्ये संभ्रम निर्माण झाला. ही जागा काँग्रेसला दिली होती. मात्र, या ठिकाणी काँग्रेसचे उमेदवार अर्ज भरू शकले नाही. त्या जागेवर काँग्रेसच्या नेत्याच्या पुत्राने अपक्ष म्हणून अर्ज भरला. त्यामुळे या जागेसाठी काही लोकांमध्ये संभ्रम निर्माण झाला, असा अजित पवार यांच्या विधानाचा अर्थ असावा, असे जयंत पाटील यांनी सांगत बाजू सावरण्याचा प्रयत्न केला.

याच धर्तीवर ‘कहीं पे निगायें कहीं पे निशाना’ अशा भूमिकेतून महाविकास आघाडीत एकवाक्यता झाली नाही, तर नाराज घटक पक्ष ‘अपक्ष’ उमेदवाराच्या पाठिशी ताकद उभा करणार आणि यामध्ये राष्ट्रवादीसह महाविकास आघाडीला मोठा फटका बसणार आहे. त्यासाठी दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांनी २००३ मध्ये लढवलेल्या विधान परिषद निवडणुकीचा संदर्भ दिला जात आहे. त्यावेळी बंडखोरी करुन निवडणुकीच्या रिंगणात उतरलेले लक्ष्मण जगताप यांना अजित पवारांनी मदत करुन निवडून आणले होते. महाविकास आघाडीतील ठाकरे गट आणि राष्ट्रवादी यांच्या रस्सीखेचमध्ये ही जागा ठाकरे गटाला गेल्यास अजित पवार २००३ ची पुनरावृत्ती करतील, असे निरीक्षण राजकीय जाणकारांनी नोंदवले आहे.

### राहुल कलाटे यांची सावध भूमिका...

» चिंचवडमध्ये शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि वंचित आघाडीकडून राहुल कलाटे यांनी पक्षश्रेष्ठींच्या बैठकीत हजेरी लावली. त्याद्वारे महाविकास आघाडीच्या उमेदवारीवर दावा केला. तसेच, विधान परिषदेच्या सभापती आणि शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्या नीलम गोऱ्हे यांनी पोटनिवडणुकीत महाविकास आघाडीने आम्हाला गृहित धरु नये, असा सूचक इशारा दिला आहे. वास्तविक, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि वंचित बहुजन आघाडीची युती झाल्यामुळे राहुल कलाटे ‘मशाल’ चिन्हावर निवडणूक लढवण्यासाठी प्राधान्य देण्याची शक्यता आहे. कारण, या दोन्ही पक्षांची प्रभावी ताकद चिंचवड मतदार संघात आहे. मात्र, “महाविकास आघाडीचा उमेदवार म्हणून मी निवडणूक लढवण्यास इच्छुक असून, पक्षश्रेष्ठी जो निर्णय घेतील, त्याप्रमाणे काम करणार आहे.” अशी सावध भूमिका राहुल कलाटे यांनी घेतली आहे.

### मुंबईतील महाविकास आघाडीच्या बैठकीकडे लक्ष...

» राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या स्थानिक नेत्यांनी “ उमेदवार आयात नको, पक्षाकडून आठजण इच्छुक आहेत. त्यापैकी कुणालाही संधी द्या,” अशी आग्रही मागणी केली आहे. तसेच, शिवसेना ठाकरे गटानेही दावा केला आहे. त्यामुळे महाविकास आघाडीच्या उमेदवारीबाबत ‘धर्मसंकट’ निर्माण होणार आहे. यासंदर्भात मुंबई महाविकास आघाडीच्या नेत्यांची आज बैठक होणार आहे. त्यामध्ये उमदेवारीबाबत निर्णय होणार आहे. चिंचवडमधील जागा ठाकरे गटाला द्यावी, अशी मागणी जोर धरत आहे. या बैठकीत निवडणूक ही ‘मशाल’ चिन्हावर लढवण्यावर शिक्कामोर्तब झाल्यास राष्ट्रवादी काँग्रेसचे स्थानिक नेते आणि वरिष्ठ नेतेसुद्धा महाविकास आघाडीच्या उमेदवाराचे काम करणार नाहीत. याउलट, राष्ट्रवादीतील इच्छुकांपैकी एकजण प्रभावी उमेदवार म्हणून ‘अपक्ष’ मैदानात उतरवला जाईल, अशी शेवटच्या कार्यकर्त्यांची भूमिका आहे.

### अभी नहीं तो कभी नहीं...नाना समर्थक आक्रमक...

» महाविकास आघाडीच्या माध्यमातून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नेते नाना काटे यांना उमेदवारी मिळावी. याकरिता राष्ट्रवादीतील मोठा गट एकवटला आहे. किंबहुना, आयात उमेदवार नको, अशी आग्रही मागणी नाना समर्थकांसह राष्ट्रवादीच्या निष्ठावंत गटाकडून केली जात आहे. वास्तविक, चिंचवड विधानसभा पोटनिवडणुकीच्या निकालावर आगामी महापालिका आणि विधानसभा, लोकसभा निवडणुकीचे चित्र स्पष्ट होणार आहे. आता विधानसभेवर दावेदारी हुकली, की पुढील १० वर्षे आमदारकीची महात्त्वाकांक्षा पूर्ण करता येणार नाही. नाना काटे यांनी २०१४ पासून विधानसभा निवडणुकीची तयारी सुरू ठेवली आहे. मतदार संघातील प्रत्येक गावात नाना काटे समर्थकांचे जाळे आहे. अशा परिस्थितीत या निवडणुकीत कोणत्याही परिस्थितीत माघार घ्यायची नाही, अशी भूमिका नाना समर्थकांची आहे. त्यासाठी “अभी नहीं तो कभी नहीं...” असा संकल्प करण्यात आला आहे.

## शॉर्ट न्यूज

### शिंदे गटातील नेते निलेश माझिरे यांच्या पत्नीने आयुष्य संपवलं



पुणे : पुण्यातील बाळासाहेबांची शिवसेनेतील (शिंदे गट) नेते तथा माथाडी जिल्हाध्यक्ष निलेश माझिरे यांच्या पत्नी सोनाली माझिरे यांनी आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. सोनाली यांनी बुधवारी विष प्राशन केल्यानंतर त्यांचा काल म्हणजे गुरूवारी रात्री रुग्णालयात मृत्यू झाला आहे. कौटुंबिक वादातून ही आत्महत्या केली असल्याचा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात आला आहे. निलेश माझिरे हे कामगार सेनेचे जिल्हाध्यक्ष आहेत. काही दिवसांपूर्वी त्यांची मनसेमधून हकालपट्टी करण्यात आली होती. त्यानंतर त्यांनी बाळासाहेबांची शिवसेनेत प्रवेश केला होता.

# कसबा पोटनिवडणूक : अभिजित बिचुकलेंची एन्ट्री!

## » पत्नीने नेला उमेदवारी अर्ज : कसबा पेठ पोटनिवडणूक रंगतदार होण्याची शक्यता

।पुणे । महाईन्यूज ।

प्रतिनिधी।

**आमदारकी, खासदारकीपासून ते अगदी राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीच्या रिंगणात उतरुन कायमच सर्वांचे लक्ष वेधून घेणारे बिग बॉस फेम अभिजित बिचुकले पुन्हा एकदा चर्चेत आले आहेत. अभिजित बिचुकले यांनी कसबा पेठ पोटनिवडणुकीत उतरण्याचे संकेत दिले आहेत.**

भाजप आमदार मुक्ता टिळक यांच्या निधनामुळे कसबा मतदारसंघाची जागा रिक्त झाली होती. या जागेसाठी येत्या २६ फेब्रुवारीला मतदान होणार आहे, तर २ मार्चला निकाल जाहीर



होणार आहे. सध्या कसबा पेठ आणि चिंचवड पोटनिवडणुकीच्या उमेदवारी अर्जाचे वाटप सुरु आहे. भाजपकडून ही पोटनिवडणूक बिनविरोध करण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत. मात्र, महाविकास आघाडीतील कॉंग्रेस आणि राष्ट्रवादी हे दोन्ही पक्ष या जागेवरुन लढण्यास उत्सुक आहेत. त्यामुळे कसबा पेठ पोटनिवडणूक रंगतदार होण्याची शक्यता आहे. अशात अभिजित बिचुकले रिंगणात उतरल्यास ही पोटनिवडणूक आणखीनच गाजण्याची शक्यता आहे.

अभिजित बिचुकले यांच्या पत्नी अलकृंता बिचुकले यांनी शुक्रवारी पोटनिवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज विकत घेतला. त्यामुळे आता अभिजित बिचुकले पोटनिवडणूक लढतील, अशी चर्चा सुरु झाली आहे. अभिजित बिचुकले हे सातत्याने त्यांचा फॅशन सेन्स, स्टाईल आणि बेधडक वक्तव्यांमुळे चर्चेत असतात. काही दिवसांपूर्वी पुण्यात अभिजित बिचुकले यांच्या गाडीचा अपघात झाला होता. यामध्ये अभिजित बिचुकले यांच्या डोक्याला दुखापत झाली होती. मात्र, प्राथमिक उपचारानंतर त्यांना रुग्णालयातून डिस्चार्ज मिळाला होता. यानंतर अभिजित बिचुकले यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून चाहत्यांशी संवाद साधत आपली प्रकृती स्थिर असल्याचे सांगितले होते.

यापूर्वी २०१९ मध्ये अभिजित बिचुकले यांनी मुंबईच्या वरळी विधानसभा मतदारसंघातून आदित्य ठाकरे यांच्याविरोधात निवडणूक लढवली होती. तेव्हादेखील अभिजित बिचुकले यांनी जोरदार प्रचार करत सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते. मात्र, या निवडणुकीत अभिजित बिचुकले यांचे डिपॉझिट जप्त झाले होते.

### कोण आहेत अभिजित बिचुकले?

- अभिजित बिचुकले हे मुळचे साताऱ्यातील आहेत. पुण्यात त्यांचा पेढ्यांचा व्यवसाय आहे.
- अभिजित बिचुकले हे सर्वप्रथम राष्ट्रपतीपदाची निवडणूक लढवल्यामुळे प्रकाशझोतात आले होते.
- अभिजित बिचुकले यांनी आतापर्यंत नगरसेवक पदापासून ते राष्ट्रपती पदापर्यंत अनेक निवडणुका लढवल्या आहेत. मात्र, एकाही निवडणुकीत त्यांना यश मिळालेले नाही.
- त्यांनी साताऱ्यातून उदयनराजे भोसले यांच्याविरुद्धही निवडणूक लढवली होती.
- टेलिव्हिजनवरील बिग बॉस या कार्यक्रमातही अभिजित बिचुकले सहभागी झाले होते. त्यामुळे बिचुकले यांना अमाप प्रसिद्धी मिळाली होती.

# अजित पवारांवर टीका करताना पडळकरांची जीभ घसरली

।पुणे । महाईन्यूज ।

प्रतिनिधी।

संभाजी महाराज हे धर्मवीर नाहीत, असं म्हणणाऱ्यांची कदाचित सुंता झाली असावी, अशी शेलकी टीका भाजप नेते गोपीचंद पडळकर यांनी केली आहे. त्यांच्या या वक्तव्यावरुन राजकीय वातावरण तापण्याची शक्यता आहे. विधानसभेचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी हिवाळी अधिवेशनादरम्यान छत्रपती संभाजी महाराज यांच्याबाबत केलेल्या एका वक्तव्यावरुन प्रचंड गदारोळ झाला होता. छत्रपती संभाजी महाराज हे स्वराज्यरक्षक होते, त्यांना धर्मवीर म्हणू नका. त्यांना कोणत्याही एका धर्माशी जोडणे उचित ठरणार नाही, असे अजित पवार यांनी म्हटले होते. त्यांच्या या वक्तव्यानंतर भाजप नेत्यांनी राज्यभरात रान उठवले



होते. त्यानंतर अनेक दिवस यावरुन मोर्चे, आंदोलनं, आरोप-प्रत्यारोप सुरु होते. हा वाद आता कुठे शमतो न शमतो तोच भाजपचे विधानपरिषदेचे आमदार गोपीचंद पडळकर यांनी हा मुद्दा पुन्हा उकरून काढला आहे. यावरुन अजित पवार यांच्यावर टीकास्त्र सोडताना गोपीचंद पडळकर यांनी अत्यंत खालच्या पातळीला जाऊन वक्तव्य केले. त्यामुळे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष आक्रमक होण्याची चिन्हे आहेत. गोपीचंद पडळकर यांनी पुण्यातील एका कार्यक्रमात बोलताना हे वक्तव्य केले. संभाजी महाराज हे धर्मवीर नाहीत, असं जे कोणी म्हणतायत त्यांची कदाचित सुंता झाली असेल.

# गती कमी होताच कळतं दिशाच वेगळ्या आहेत

## » अमोल कोल्हेंच्या पोस्टने पुन्हा चर्चांना उधाण

।पुणे । महाईन्यूज ।

प्रतिनिधी।

शिरूर लोकसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी कॉंग्रेसचे खासदार अमोल कोल्हे हे मागील काही काळापासून सातत्याने आपल्या राजकीय भूमिकांमुळे चर्चेत आहेत. केंद्रासह राज्यातील भाजप नेत्यांसोबत वारंवार होणाऱ्या भेटीगाठी आणि सूचक राजकीय वक्तव्यांमुळे अमोल कोल्हे हे राष्ट्रवादीत नाराज असल्याचं बोललं जात होतं. मात्र स्वतः खासदार कोल्हे यांनी या चर्चा फेटाळून लावल्या होत्या. अशातच अमोल कोल्हे यांनी आज केलेल्या एका इन्स्टाग्राम पोस्टवरून पुन्हा नव्याने तर्क-वितर्क लढवले जात आहेत.

'जोपर्यंत गती आहे तोपर्यंत चक्र एकाच दिशेने भासतात, पण गती कमी होताच कळतं दिशाच वेगळ्या आहेत. याला निसर्गाचा नियम म्हणायचं की सगळीकडेच असं



असतं? आयुष्य, करिअर, राजकारण... गती कमी झाल्यानंतर दिशा कळते,' अशा मजकुरासह अमोल कोल्हे यांनी इन्स्टाग्रामवर एक व्हिडिओ शेअर केला आहे.

एकीकडे राष्ट्रवादीतील नाराजीची चर्चा आणि भाजप नेत्यांसोबत वाढलेल्या जवळीकीबद्दल चर्चा होत असतानाच राजकारणाचा उल्लेख करत अमोल कोल्हे यांनी दिशेबाबतचा संभ्रम व्यक्त करणारा व्हिडिओ शेअर केल्याने पुन्हा एकदा सर्वांच्या भुवया उंचावल्या आहेत.

'मी शेतकऱ्याचा पोरगा आहे, एक गोष्ट पक्की ठाऊक आहे की शेतकरी उगाच औत खांद्यावर घेऊन हिंडत नाही, वारा आणि आभाळ बघून गणित बांधायचं असतं आणि मग वावर नांगरायला घ्यायचं असतं,' असं सूचक वक्तव्य अमोल कोल्हे यांनी केलं होतं.

दरम्यान, राष्ट्रवादीचे युवा नेते आणि आमदार रोहित पवार हे एका आंदोलनानिमित्त अमोल कोल्हे यांच्या लोकसभा मतदारसंघात आले होते. त्यावेळीही कोल्हे यांची अनुपस्थिती ठळकपणे जाणवली होती. नाराजीच्या चर्चा सुरू असताना अमोल कोल्हे यांनी मात्र आपण राष्ट्रवादीसोबतच असल्याचं सांगितलं आहे. 'राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये आपण नाराज असण्याचे काहीच कारण नाही. त्यामुळे मी कोणत्याही कारणास्तव नाराज नाही. मी नाराज असेल तर थेट शरद पवार, अजित पवार, सुप्रिया सुळे यांच्याशी बोलू शकतो,' असं कोल्हे यांनी काही दिवसांपूर्वी म्हटलं होतं.

### अमोल कोल्हे आणि संभ्रम निर्माण करणाऱ्या घटनांची मालिका

**» खासदार म्हणून संसदेत निवडून गेल्यानंतर वारंवार केंद्र सरकारवर टीकेचे बाण सोडणारे अमोल कोल्हे हे मागील काही महिन्यांपासून विविध भाजप नेत्यांच्या संपर्कात असल्याचं दिसत आहे. कोल्हे यांनी भाजप नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली होती. 'शिवप्रताप गरुडझेप' या चित्रपटाच्या स्क्रिनिंगनिमित्त ही भेट घेतल्याचं त्यांच्याकडून सांगण्यात आलं होतं. मात्र नंतरच्या काळातही महाराष्ट्र भाजपमधील विविध नेत्यांना ते भेटत राहिले. तसंच पुढील राजकीय प्रवासाबद्दल प्रश्न विचारल्यानंतर त्यांनी दिलेल्या एका प्रतिक्रियेचीही चांगलीच चर्चा झाली होती.**

# आम्ही शेवटपर्यंत एक!

## » आदित्य जगताप यांची भावनिक पोस्ट : जगताप विरोधकांचा अंदाज फोल

। पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप कुटुंबियांमध्ये दोन गट निर्माण झाले आहेत. त्याचा राजकीय फायदा होईल आणि चिंचवडची पोटनिवडणूक सोपी होईल, असा भ्रम हवेत विरला आहे. ही निवडणूक महाविकास आघाडीसह जगताप विरोधकांसाठी अत्यंत आव्हानात्मक होणार, यावर आता शिक्कामोर्तब झाले आहे.**



चिंचवड पोटनिवडणुक उमेदवारीवरून दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांच्या घरातील कलह विकोपाला गेल्याच्या बातम्या पसरवण्यात आल्या. त्यातच जगताप यांच्या पत्नी अश्विनी जगताप आणि बंधू शंकर जगताप यांनी स्वतंत्रपणे उमेदवारी अर्ज विकत घेतल्याचे भांडवल करुन जगताप घराण्यामध्ये दोन गट निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, या चर्चेला जगताप यांचे सुपूत्र दोन ओळींमध्ये पूर्णविराम दिला.

आपल्या पोस्टमध्ये आदित्य याने एकत्र कुटुंबाचा एक फोटो शेअर केला आहे. त्यात स्वतः आमदार जगताप, त्यांचे दोन्ही भाऊ विजय, शंकर तसेच आश्विनी जगताप, भावजया आणि पुतणे आहेत. आदित्यने त्या फोटोखाली एक पोस्ट लिहीली आहे. त्यात तो म्हणतो, "जगातील कोणतीही शक्ती आम्हाला वेगळे करु शकत नाही, आम्ही शेवटपर्यंत एक आहोत."'

दरम्यान, निवडणूक बिनविरोध निवडणूक करण्याचा प्रयत्न करू, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ,पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितले होते. पण, देगलूर, कोल्हापूर, नांदेड पोटनिवडणुकीचा वचपा काढायचा आणि चिंचवडमध्ये भाजपचा पाडाव करायचाच या दृष्टीने सर्व विरोधक कामाला लागले . जगताप कुटुंबातच एकवाक्यता नसल्याने आता निवडणूक वेगळ्या वळणावर येऊन ठेपली. आश्विनी जगताप यांना मोठी सहानुभूती आहे म्हणून त्यांनाच संधी द्यावी, अशी भाजपामध्ये एका गटाची मागणी आहे, तर आगामी महापालिका जिंकायची असेल तर शंकर जगताप यांना उमेदवारी द्या, असा दुसरा मतप्रवाह आहे, असा दावा करण्यात आला. मात्र, जगताप यांचा मुलगा आदित्य याने "एक

### पोस्ट भावनिक नव्हे, राजकीय प्रगल्भता...

**»आदित्य जगताप याने "जगातील कोणतीही शक्ती आम्हाला वेगळे करु शकत नाही, आम्ही शेवटपर्यंत एक आहोत."अशी फेसबूक पोस्ट केल्यानंतर ही भावनिक पोस्ट केल्याचे सांगितले जात आहे. मात्र, दिवंगत आमदार जगताप यांच्या मुलाची ही पोस्ट भावनिक नव्हे, तर राजकीय प्रगल्भपणा आहे. आश्विनी जगताप आणि शंकर जगताप असे दोन गट सुरवातीला तयार झाले. मात्र, शंकर जगताप यांनी सर्वांना सोबत घेवून पुढची दिशा ठरवली. याबाबत कुठेही जाहीरपणे वक्तव्य न करता आदित्य जगताप यांने दोन ओळीत विषय क्लोज केला. ही राजकीय प्रगल्भता जगताप कुटुंबियांमध्ये आहे. त्यामुळे चिंचवडमध्ये जगताप यांना आव्हान देणे सहज सोपे नाही, असे संदेश आदित्य जगताप याने दिला आहे, असे जगताप जगताप समर्थक सांगतात.**

---

# पिंपरी-चिंचवडमधील सात टोळ्यांचा बंदोबस्त

## 110 जणांवर मोकाची कारवाई : गुन्हेगारांचे धाबे दणाणले




।पिंपरी चिंचवड ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड पोलिसांनी जानेवारीत सात टोळ्यांतील ११० गुन्हेगारांवर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी प्रतिबंधक कायद्यांतर्गत (मोका) कारवाई केली. पोलिसांनी ही मोठी कारवाई केल्याने गुन्हेगारांचे धाबे दणाणले आहेत.**

पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत संघटित गुन्हेगारी टोळ्यांमधील गुन्हेगारांवर जरब बसविण्यासाठी सर्व पोलिस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्यांना पोलिस आयुक्तांनी सक्त सूचना दिल्या होत्या. त्यानुसार मागील काही दिवसांमध्ये गुन्हेगारी टोळ्यांचे रेकॉर्ड अद्ययावत करून त्यांच्याबाबत विविध पोलिस ठाणे व गुन्हे शाखेकडून आढावा घेण्यात आला.

त्यानंतर संबंधित गुन्हेगारांवर मोका कायद्यांतर्गत कारवाई करण्याचे प्रस्ताव वरिष्ठ अधिकाऱ्यांना सादर करण्यात आले होते.

त्यानंतर विविध पोलिस ठाण्याच्या हद्दीतील सात टोळ्यांतील ११० गुन्हेगारांवर मोका कायद्यांतर्गत कारवाई करून गुन्हेगारांच्या मुसक्या आवळण्यात आल्या.

तर अक्षय मुकुंद गायकवाड याच्यावर एमपीडीए अंतर्गत कारवाई करून कारागृहात स्थानबद्ध करण्यात आले.

### पोलिस ठाणेनिहाय कारवाई झालेले कारवाई..

**» पोलिस ठाणे – टोळी**
**चिंचवड – अनिल तुकाराम मोहिते व इतर १० जण**
**हिंजवडी – हिरा बहादूर हमाल व इतर ७ जण**
**चाकण – शुभम सुरेश म्हस्के व इतर १७ जण**
**निगडी – दत्ता बाबू सूर्यवंशी व इतर ३ जण**
**चिंचवड – आकाश राजू काळे व इतर ६ जण**
**पिंपरी – विशाल विष्णू लष्करे व इतर ३० जण**
**तळेगाव दाभाडे – कुणाल धीरज ठाकूर व इतर २९ जण**

# चिंचवडसाठी ३२ जणांनी अर्ज नेले; एकाचा अर्ज दाखल

## राष्ट्रवादी काँग्रेसचे भाऊसाहेब भोईर, प्रशांत शितोळे, मोरेश्वर भोंडवे आदिंचा समावेश

। पिंपरी । महाईन्यूज ।

चिंचवड विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीसाठी मंगळवार (ता. ३१) पासून उमेदवारी अर्ज वितरण व स्वीकृती सुरु झाली. त्यानुसार शुक्रवारी (ता. ३) ३२ जणांनी ६२ उमेदवारी अर्ज नेले आहेत. यामध्ये दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांचे बंधू, भाजपा चिंचवड विधानसभेचे प्रभारी शंकर जगताप, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे भाऊसाहेब भोईर, प्रशांत शितोळे, मोरेश्वर भोंडवे आदिंचा समावेश आहे. तर; एका जणाने अर्ज दाखल केला.

थेरगाव येथील निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयातून उमेदवारी अर्ज वितरण व स्वीकृत केले जात आहेत. आजपर्यंत ४ जणांनी ५ अर्ज दाखल केले आहेत. तर; ९३ जणांनी १७० अर्ज नेले आहेत. आज रफिक कुरेशी यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला. शुक्रवारी अर्ज नेणाऱ्यांमध्ये शंकर जगताप, भाऊसाहेब भोईर, प्रशांत शितोळे, मोरेश्वर भोंडवे यांच्यासह संतोष किसन नवले, नंदू बारणे, राजेश नागोसे, शंकर माने, प्रविणकुमार कदम, श्रीकांत गोरे, मनोज खंडागळे, सतिश कांबिये, सुरेश जगधने, सायली नढे, प्रतिमा राजे, दिलीप पांढरकर, राहुल मदने, ॲड. मिलिंद कांबळे, मेहुल जोशी, श्रीगणेश कदम, दयानंद सरवदे, ज्ञानेश्वर मलशेट्टी, रवि नांगरे, निखील भोईर, भाग्यश्री भोईर, झेविअर अन्थोनी, सचिन धनकुडे, सुहास गजरमल, आनंद काटे, प्रियांका कदम, स्वप्नील बनसोडे, राजश्री कोरडे यांचा समावेश आहे. दरम्यान; दिवंगत आमदार जगताप यांचे कट्टर समर्थक पिंपळे सौदागर येथील संतोष किसन नवले यांनी अर्ज नेल्यामुळे राजकीय वर्तुळात आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

## संपादकीय »

# भाकर फिरवणारा निकाल

*राज्यातील विधान परिषदेच्या पाच जागांसाठी झालेल्या मतदानाचा आज निकाल लागला. या निकालातून मतदारांनी भाकर करपण्याच्या अगोदर ती फिरवण्याचा लोकशाहीला साजेसा निर्णय घेतल्याचे दिसून आले.*

कोकण, नागपूर आणि औरंगाबाद इथे शिक्षक आणि नाशिक ,अमरावती येथे पदवीधर मतदार संघाची निवडणूक झाली. आज जाहीर झालेल्या निकालात पाचपैकी ३ जागांवर महाविकास आघाडीला,एकावर भाजप तर एकावर अपक्ष उमेदवाराला मतदारांनी विजयी करून सत्ताधारी भाजप-शिंदे सरकारला आत्मपरीक्षण करण्याचे संकेत दिले आहेत. नाशिक,येथील उमेदवार सत्यजित तांबे जरी अपक्ष असले तरी ते मूळ काँग्रेसी असल्याने या निवडणुकीत सत्ताधारी पक्षाला केवळ एकच जागा मिळवता आली. भाजपला नागपूरची जागा गमावण्याची वेळ आल्यामुळे मातृसंस्थेच्या बालेकिल्ल्यातील पराभव या पक्षाला चिंतन पाण्यासारखा आहे. शिक्षक आणि पदवीधर निवडणुकीत जुन्या पेन्शन योजनेने भाजपचा घात केल्याचे दिसून आले. मतमोजणी सुरु होण्याच्या काही मिनिटे अगोदर भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचे वक्तव्य ऐकले तर या पाचही जागा मोठ्या मताधिक्याने विजयी होतील असा आत्मविश्वास त्यातून दिसून आला मात्र दुपारी त्यांनी निकालाचे वेगळ्या पद्धतीने विश्लेषण करायला सुरुवात करून " पडलो तरी टक्केवारी बघा " या पद्धतीने वक्तव्ये करायला सुरुवात केल्याचे दिसून येते.

भाजपवाले बोलण्यात पोपट असतात यात कुणालाही संशय नाही त्याचाच प्रत्यय नेत्यांच्या वक्तव्यावरून येतो. आज निकाल जाहीर झालेल्या पाच जागांपैकी नाशिक पदवीधर वगळता चार जागांवर भाजपचे उमेदवार होते. नाशिकमध्ये काँग्रेस बंडखोर सत्यजित तांबे याना स्थानिक पातळीवरून पाठिंबा देण्याची भाजपची खेळी मात्र यशस्वी झाल्याचे दिसून आले. पक्षाला मात्र एका जागेचे नुकसान झाल्याचे दिसून आले आहे. नागपुरातील उमेदवार नागो गाणार यांचा पराभव झाल्यावर ते शिक्षक परिषदेचे उमेदवार असल्याची तांत्रिक बाब आता भाजप पुढे करीत आहे.

१ नोव्हेंबर २००५ रोजी सरकारी कर्मचाऱ्यांची जुनी पेन्शन योजना बंद करण्यात अली त्यावेळी राष्ट्रवादीचे अजित पवार अर्थमंत्री होते ,त्यानंतर भाजप सरकार आल्यावर देवेंद्र फडणवीस पूर्णवेळ मुख्यमंत्री होते मात्र त्यांनी या योजनेकडे कधीही लक्ष दिले नाही त्यामुळे त्याचा सर्वात मोठा फटका यावेळी भाजपला बसला. ज्यांनी जुनी पेन्शन बंद केली त्यांनीच त्याचे खापर भाजपवर फोडण्याची खेळी केली आणि त्यात यश मिळवले हे या निकालाचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल.

# भागवत नका होऊ, भागवत कथा सांगत राहा !






मध्यप्रदेशातील छतरपूर जिल्ह्यातील गडा या गावात असणाऱ्या बागेश्वर धाम नामक मठाचे स्वयंघोषित मठाधिपती धीरेंद्र कृष्ण शास्त्री या २७ वर्षीय तरुणाचा सध्या स्वतःला कट्टर हिंदू समजल्या जाणाऱ्या समूहात मोठा बोलबाला आहे. गर्ग या ब्राह्मण पुजारी कुटुंबात जन्मलेला हा तरुण प्रवचनकार सोशल मीडियाच्या मदतीने झपाट्याने लोकप्रियतेच्या शिखरावर पोहोचला आहे. मुळात देशभरातील भाविकांना मठात बोलावणे आणि त्यांच्या दुःखाचे निवारण करण्याचे अमिश दाखवून नंतर ऐच्छिक देणग्या गोळा करणे त्यासाठी गरिबांना भोजनदान,गोपालन आणि कॅन्सर हॉस्पिटल उभारणी हे धर्मादाय उपक्रम पुढे करून रसद गोळा करण्याचा प्रमुख कार्यक्रम हे महाशय करतात मात्र तेवढ्यावर कुणी गर्दी करणार नाही म्हणून जिथे जातील तिथे " रामकथा " हे चलनी नाणे बनलेले नाव वापरायला ते विसरत नाहीत. वरून कीर्तन आतून तमाशा या म्हणीप्रमाणे वरून रामकथा आणि आतून दिव्यदरबार असे त्यांचे आयोजन असते.

नागपुरात ५ ते १३ डिसेंबर याकाळात रेशीमबागमध्ये आयोजन काळात अंधश्रद्धा निर्मूलन समितीने त्यांना दिव्यशक्ती सिद्ध करून दाखविण्याचे आव्हान दिल्यावर हा बाबा दोन दिवस आधीच नागपुरातून पसार झाल्याने विदर्भातील वातावरण ढवळून निघाले होते. नितीन गडकरी,देवेंद्र फडणवीस या मोठ्या नेत्यांनी रामकथेच्या पहिल्याच दिवशी या बाबाच्या पायावर डोके टेकवल्यामुळे त्यांना संरक्षण कोणाचे आहे हे कुणाला सांगण्याची गरज पडली नाही. राज्याचा साक्षात गृहमंत्रीच जर या बाबाचा भक्त असेल तर त्याने कुणाला भिण्याचे काहीच कारण नाही. हा बाबा मोठा चलाख आहे . रामकथेचे नावावर मध्येच तो आपला मूळ धंदा असणारा " दिव्यदरबार " भरवतो आणि त्यातून लोकांच्या समस्या, भविष्य आणि दुःख निवारण करण्याचा आभास निर्माण करतो. लोकांना नेहमीचे ठोकताळे सांगितले की काही हा,हमखास बरोबर निघतात आणि मग गर्दीत घुसलेले अनुयायी बाबांचा जयजयकार करतात.

श्याम मानव यांनी दिलेले आव्हान न स्वीकारताच बाबानी नागपुरातून काढता पाय घेऊन आपला मुक्काम रायपुरात हलवला आणि इकडे गृहमंत्र्यांच्या या बाबाला नागपूर पोलिसांनी काहीही कारवाई न करता सुखरूप राज्याबाहेर पाठवून दिले. पुढे रायपूरला या बाबाने जणू काही आपण मोठे युद्ध जिंकले या थाटात घोषणा केली की " तुम मुझे साथ दो ,मै तुम्हे हिंदुराष्ट्र दूंगा " निमित्त होते नेताजी सुभाष बाबू यांच्या जयंतीचे. बाबानी अशी घोषणा केल्यावर कट्टर हिंडून अनुयायांना तर स्वर्ग दोन बोटेच उरला आहे. हिंदुराष्ट्र हा शब्द ऐकला की भाजपचे तमाम नेते पुढचे काहीही समजून न घेता समर्थन करायला लागतात याची बाबाला माहिती आहेच. झालेही तसेच. सगळे नेते बाबांचे समर्थन करायला लागले मात्र जोशीमठातील शंकराचार्य अविमुक्तानंद यांनी त्याच्या चमत्कारावर संशय व्यक्त करताच सगळं मामला थंड पडला तरीही त्यांच्या हिंदुराष्ट्र घोषणेचे अजूनही समर्थन सुरु आहे. धीरेंद्र शास्त्री यांचे वय सध्या केवळ २७ आहे , त्यांच्यात अजून अबर्याच बाबतीत समजूतदारपणा ,गंभीरता आणि सामाजिक भान येणे बाकी आहे. धर्माचा अभ्यास म्हणाल तर सगळे काही वरवरचे जाणवत आहे. डोक्यात भरलेला मुस्लिम द्वेष लपून राहू शकत नाही. त्यासाठी शाहरुख खानच्या पठाण सिनेमावर बहिष्कार घालण्याच्या सामूहिक शपथा देण्याचे महान कार्य करूनही पठाण सिनेमाची दोन दिवसात दोनशे कोटींवर कमाई जाते यावरून त्यांच्या शपथा लोकांनी किती गंभीरपणे घेतल्या असतील याची कल्पना येते. जो दार दहा मिनिटांनी एखादी शिवी देतो,गोळा होणाऱ्या हजारो भाविकांना पागल संबोधतो आणि नंगा कर दूंगा अशी भाषा वापरतो असा उथळ प्रवचनकार या विराट देशाला हिंदुराष्ट्र देणार असल्याच्या विनोदावर विश्वास तरी कुणी ठेवावा ? ज्यांनी हिंदुत्व देशात आणि विदेशात रुजवले त्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि सरसंघचालक मोहन भागवत याना सुद्धा भारताला हिंदुराष्ट्र करण्याची अद्याप गरज वाटली नाही. धीरेंद्र शास्त्री यांनी आणखी काही वर्षंतरी भागवत बनण्याचा प्रयत्न करू नये , मिळेल त्या बिदागीवर भागवत कथा सांगत राहायला हवे. दिव्यादरबार भरवून अज्ञानी लोकांना जादूटोणा,करणी,भानामती यावर अमूल्य मार्गदर्शन करीत राहावे.

# स्थलांतर आणि पक्षी

**खूप प्रमाणात स्निग्ध पदार्थ साठवून ठेवल्यामुळे अधिक ऊर्जा निर्माण होऊ शकते आणि ही ऊर्जा त्यांना अनेक तास किंवा दिवस उड्डाणासाठी मदत करते. या अनुकूलनामुळे स्थलांतर**

भारतात पक्ष्यांच्या अनेक प्रजाती हिवाळ्यात स्थलांतर करतात. हे पक्षी हजारो किलोमीटरचे अंतर कसे काय पार करतात? यासाठी स्थलांतरित पक्ष्यांमध्ये कोणती वैशिष्ट्ये असतात? स्थलांतरित पक्ष्यांचे पंख इतर पक्ष्यांच्या तुलनेत लांब व टोकदार असतात. त्यांचे हृदय आकाराने अधिक मोठे असते व हिमोग्लोबिनचे प्रमाण अधिक असते. याचबरोबर, हिमोग्लोबिनची प्राणवायूला बांधण्याची क्षमतादेखील जास्त असते. अशा पक्ष्यांकडे एक विशेष श्वसन प्रणाली असते, ज्यामुळे ते हवेतून अधिक प्रमाणात प्राणवायू शोषून घेऊ शकतात. या प्राणवायूचा उपयोग पंखांतील स्नायूंना बराच वेळ कार्यरत ठेवण्यासाठी होतो. अशा पक्ष्यांच्या पेशींमध्ये तंतूकणिकांचे (मायटोकोण्ड्रियाचे) घनफळ जास्त असते. यामुळे पेशी अधिक प्रमाणात ऊर्जा निर्मिती करू शकतात, आणि पक्ष्यांना एकाच वेळी जास्त अंतर पार करता येते.



स्थलांतर करणाऱ्या पक्ष्यांच्या अन्न व पाण्याच्या गरजा वेगळ्या असतात. हे पक्षी प्रामुख्याने स्निग्ध पदार्थयुक्त फळे, किडे व शेंगदाण्यासारखे पदार्थ खातात. खूप प्रमाणात स्निग्ध पदार्थ साठवून ठेवल्यामुळे अधिक ऊर्जा निर्माण होऊ शकते आणि ही ऊर्जा त्यांना अनेक तास किंवा दिवस उड्डाणासाठी मदत करते. या अनुकूलनामुळे स्थलांतर करणाऱ्या पक्ष्यांना समुद्रसपाटीपासून उंच असणाऱ्या व प्राणवायूची पातळी कमी असणाऱ्या मार्गांवर उडण्यास मदत होते.

हवामान बदलाचा फटका स्थलांतरणाला बसला आहे. हवामान बदलांमुळे काही पक्ष्यांच्या प्रजाती नेहमीपेक्षा लवकर स्थलांतर करत आहेत. एखाद्या ठिकाणी लवकर आल्यामुळे त्या मार्गावर बरेचदा पुरेसे अन्न नसते. अपुऱ्या अन्नासोबतच अति उष्ण किंवा थंड तापमान आणि मानवी अतिक्रमण हेदेखील पक्ष्यांच्या स्थलांतरणात अनेक अडथळे निर्माण करत आहेत.

## ।। अभंगवाणी ।।



अगा करुणाकरा करितसें धांवा ।
या मज सोडवा लवकरी ॥१॥
ऐकोनियां माझी करुणेचीं वचनें ।
व्हावें नारायणें उतावीळ ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# मराठा समाजाला मोठा धक्का!

## मराठा विद्यार्थ्यांची सरकारी नोकरी धोक्यात? EWS वर्गातून नोकरी देणं चुकीचं मॅटचा निर्णय

। मुंबई। महाईन्यूज ।

**मराठा आरक्षण रद्द झाल्यानंतर सरकारी सेवेत भरती झालेल्या विद्यार्थ्यांना राज्य सरकारने जीआर काढून EWS वर्गातून नोकरी दिली होती. मात्र, अशा पद्धतीने ही नोकरी देणं चुकीचं आहे. असा निर्णय मॅट ने दिला आहे.**

राज्य सरकारने मराठा उमेदवारांना २३ डिसेंबर २०२०च्या जीआरद्वारे पूर्वलक्षी प्रभावाने ईडब्ल्यूएस आरक्षणांतर्गत संधी खुली केली. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने मराठा आरक्षण कायदा ५ मे २०२१ रोजी रद्दबातल ठरवले असतानाही राज्य सरकारने ३१ मे २०२१च्या जीआरद्वारे मराठा उमेदवारांना ईडब्ल्यूएसचा पर्याय घेण्याची मुभा दिली.

हे दोन्ही निर्णय बेकायदा व मनमानी आहेत', असा दावा करत 'ईडब्ल्यूएस' गटातील अनेक उमेदवारांनी ॲड. गुणरत्न सदावर्ते, सबिहा अन्सारी, सय्यद तौसिफ यासीन यांच्यामार्फत आक्षेप घेण्यात आला होता.

दरम्यान, सरकारी नोकर भरतीत मराठा उमेदवारांना पूर्वी मराठा आरक्षण कायद्यांतर्गत जागा राखीव करून संधी दिल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने त्या कायद्याला स्थगिती दिली आणि नंतर तो कायदा रद्द केला म्हणून त्या उमेदवारांना भरती प्रक्रियेच्या मध्यातच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या (ईडब्ल्यूएस) आरक्षणाची संधी पूर्वलक्षी प्रभावाने खुली करण्याचा राज्य सरकारचा निर्णय बेकायदा आहे', असा महत्त्वपूर्ण निर्णय महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने (मॅट) गुरुवारी दिला.



# मुख्यमंत्री शिंदेंच्या भाषणावेळी गोंधळ

## वर्धा येथील अ. भा. मराठी साहित्य संमेलनावेळी 'वेगळा विदर्भ'च्या जोरदार घोषणा




। वर्धा । महाईन्यूज ।

**वर्धा इथं आयोजित अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचा आज पहिला दिवस होता. मात्र हा पहिलाच दिवस विदर्भवाद्यांनी घातलेल्या गोंधळामुळे चर्चेत आला आहे. मुख्यमंत्र्यांच्या भाषणावेळी हा गोंधळ झाला.**

मराठी साहित्य संमेलनामध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे सहभागी झाले होते. या संमेलनाचं उद्घाटन मुख्यमंत्र्यांनी केलं. त्यानंतर त्यांचं भाषण सुरू असतानाच विदर्भवाद्यांनी वेगळा विदर्भाच्या घोषणा देण्यास सुरुवात केली. त्यामुळे सभामंडपात गोंधळ निर्माण झाला. या आंदोलकांची दखल मुख्यमंत्री शिंदेंनीही आपल्या भाषणात घेतली.

एकनाथ शिंदे म्हणाले, हे सर्वसामान्यांचं सरकार आहे. आपण त्यांचे म्हणणे ऐकून घेऊ. हे साहित्य संमेलन आहे. आपले विषय मांडायला वेगवेगळे व्यासपीठ आहे.

या मान्यवरांचे स्वागत आपण केले पाहिजे. सरकारची दारे २४ तास उघडी आहेत. कुणाचाही अनादर करण्याचा आमचा हेतू नाही. आज हे साहित्यिकांचे राज्य आहे, कृपया तुम्ही गोंधळ घालू नये.

गोंधळ करणाऱ्या या आंदोलकांनी स्वतंत्र विदर्भाची मागणी लावून धरली. विदर्भावर उर्जा, पाणी, निधी प्रत्येक गोष्टीत अन्याय होत आहे, असं आंदोलकांचं म्हणणं होतं. दरम्यान, गोंधळ घालणाऱ्या सर्व आंदोलकांना पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे.

# विजयाच्या जल्लोषात आमदाराचाच खिसा कापला

## भाजपचे ज्ञानेश्वर म्हात्रे यांचे 75 हजार लंपास

। नवी मुंबई । महाईन्यूज ।

विधान परिषद निवडणुकीचा धुरळा उडाला. कोकण शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीत भाजपचे ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी दणदणीत विजय मिळवला. महाविकास आघाडीला धक्का बसला. मात्र, खरा धक्का म्हात्रे यांना बसला. विजयाच्या जल्लोषात त्यांचे ७५ हजार लंपास केल्याची घटना समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, विजयी मिरवणुकीत ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्या खिशातून पैसे चोरीला गेल्याची घटना घडली. ज्ञानेश्वर म्हात्रे हे विजयी झाल्यानंतर त्यांच्या समर्थकांनी मतमोजणी केंद्राबाहेर मोठा जल्लोष केला.यावेळी म्हात्रे यांना भेट देण्यासाठी, त्यांचं अभिनंदन करण्यासाठी मोठ्या प्रमाणात कार्यकर्त्यांनी त्यांना गराडा घातला. यावेळी काही कार्यकर्त्यांनी त्यांना खांद्यावर उचलून घेतलं असता त्यांच्या समोरच्या खिशात असलेले 50 हजार रुपये आणि मागच्या खिशात असलेले 25 हजार रुपये असे एकूण 75 हजार रुपये अज्ञात चोरट्यांनी चोरले. जल्लोषादरम्यान म्हात्रे यांना पैसे गेल्याचे लक्षात आले. मात्र, त्यांना गर्दीत व्यक्ती कोण होता हे समजले नाही. त्यांनी यासंदर्भात मतमोजणी केंद्रावरील पोलिसांना ताबडतोब तक्रार दिली.



# इस्लामनगरचं झालं जगदीशपूर!

## पेढे वाटून जल्लोष; रक्तरंजीत होता इतिहास



।भोपाळ। महाईन्यूज।

**मध्य प्रदेशची राजधानी भोपाळपासून १४ किमी अंतरावर असलेल्या एका सुंदर गावाचं पुन्हा एकदा नामकरण झालं आहे. १७ व्या शतकात या गावातील बनविण्यात आलेल्या किल्ल्यास पाहण्यासाठी जगभरातून पर्यटक येतात. कालपर्यंत या वास्तूचं नाव इस्लाम नगर होतं, ते आता पुन्हा एकदा जुन्याच नावाने म्हणजे जगदीशपूर नावाने ओळखले जाणार आहे.**

**सन 1715 मध्ये दोस्त मोहम्मद खान याने जगदीशपूर येथे केले होते आक्रमण**

केंद्र सरकारने या गावाचे नामांतर जगदीशपूर करण्यास मंजुरी दिली आहे. त्यानंतर, राज्य सरकारनेही बुधवारी नोटीफिकेशन जारी करुन या गावाचे नाव जगदीशपूर असं केलं आहे.

इस्लामनगर गावाचे नाव जगदीशपूर झाल्यानंतर तेथील स्थानिकांनी फटाके वाजवून अन् मिठाई वाटून जल्लोष साजरा केला. त्यावेळी, ढोल-ताशा वाजवूनही आनंद व्यक्त करण्यात आला. अंगावर काटा आणणारा हा इतिहास आहे, ज्यावेळी जगदीशपूरचे नाव इस्लामनगर करण्यात आले होते. औरंगजेबच्या सैन्याचे पळपूटे सैनिक मित्र मोहम्मद खान याने ३०८ वर्षांपूर्वी या गावाचे नाव इस्लामनगर ठेवले होते. गेल्या ३० वर्षांपासून या गावाचे नाव जगदीशपूर करण्याची फाईल सरकार दफ्तरी पडून होती.

सन १७१५ मध्ये दोस्त मोहम्मद खान याने जगदीशपूर येथे आक्रमण केले. पण, त्यांला यश मिळाले नाही. राजपूतांवर आक्रमण केल्यानंतरही अपयश आल्यामुळे मोहम्मद खानने आपल्या स्वभावनुसार मैत्रीचा हात पुढे केला. त्याने देवरा चौहान या राजाला बेस नदीकिनारी जेवणाचे आमंत्रण दिले. देवरा चौहानसह सर्वच राजपूत रात्रीचं स्नेहभोजन करत होते, त्याचवेळी तंबूची रस्सी कापण्यात आली. या सर्व राजपूतांना तलवारीने सपासप वार करुन ठार करण्यात आले. या सर्वांच्या रक्ताचा पाट शेजारील नदीत वाहिल्यानंतर नदीचं पाणीही लाल झालं होतं, असा इतिहास सांगतो. त्यानंतर, मोहम्मद खानने जगदीशपूरवर कब्जा केला आणि याचं नाव बदलून इस्लामनगर केलं होतं.

---

# 'तो' होणार आई, भारतातील पहिला ट्रान्समेल प्रेग्नंट!

## ट्रान्सजेंडर कपल जिया आणि जाहाद नामक कपल गेल्या 3 वर्षांपासून एकत्र

।तिरुअनंतपुरम। महाईन्यूज।

केरळमधील ट्रान्सजेंडर कपल जिया आणि जाहाद यांनी सोशल मीडियावरून त्यांना बाळ होणार असल्याचं जाहीर केलं आहे. दाम्पत्याने इन्स्टा पोस्टवर काही फोटोही शेअर केले आहेत. कोझीकोडमधील वैद्यकीय कॉलेजच्या डॉक्टरांच्या एका पथकाने म्हटलं की, गर्भधारणा करण्यात दाम्पत्याला कोणत्याही शारिरीक अडचणी नव्हत्या. दोघांनीही लिंग परिवर्तन केलं होतं. केरळमधील ट्रान्सजेंडर कपल जिया आणि जाहाद यांनी सोशल मीडियावरून त्यांना बाळ होणार असल्याचं जाहीर केलं आहे. दाम्पत्याने इन्स्टा पोस्टवर काही फोटोही शेअर केले आहेत. कोझीकोडमधील वैद्यकीय कॉलेजच्या डॉक्टरांच्या एका पथकाने म्हटलं की, गर्भधारणा करण्यात दाम्पत्याला कोणत्याही शारिरीक अडचणी नव्हत्या. दोघांनीही लिंग परिवर्तन केलं होतं.

जिया आणि जाहाद हे दोघेही गेल्या ३ वर्षांपासून एकत्र राहतात. जिया पुरुष म्हणून जन्मला होता, त्याने लिंगबदल शस्त्रक्रिया करून महिला झाला. तर जहाद एक महिला म्हणून जन्माला आली आणि लिंगबदलानंतर पुरुष बनली. बाळाच्या जन्मानंतर त्याला मिल्क बँकेतून दूध पाजलं जाईल असंही त्यांनी म्हटलंय.

जिया आणि जाहाद हे दोघेही गेल्या ३ वर्षांपासून एकत्र राहतात. जिया पुरुष म्हणून जन्मला होता, त्याने लिंगबदल शस्त्रक्रिया करून महिला झाला. तर जहद एक महिला म्हणून जन्माला आली आणि लिंगबदलानंतर पुरुष बनली.

बाळाच्या जन्मानंतर त्याला मिल्क बँकेतून दूध पाजलं जाईल असंही त्यांनी म्हटलंय. जाहद हा भारतात बाळाला जन्म देणारा पहिला ट्रान्समेन असेल. सर्जरीवेळी जाहदचे दोन्ही स्तन काढून टाकण्यात आले. पण गर्भाशय आणि इतर काही अवयव तसेच ठेवले होते. त्यामुळे गर्भधारणेत यश आलं. जाहद हा भारतात बाळाला जन्म देणारा पहिला ट्रान्समेन असेल. सर्जरीवेळी जाहदचे दोन्ही स्तन काढून टाकण्यात आले. पण गर्भाशय आणि इतर काही अवयव तसेच ठेवले होते. त्यामुळे गर्भधारणेत यश आलं. जियाने



इन्स्टाग्राम पोस्टमध्ये लिहिलं की, मी जन्माने किंवा शरिराने महिला नव्हते, माझ्यात एक स्त्री होती. तिचं स्वप्न होतं की माझंही एक बाळ असावं आणि ते मला आई म्हणावं. जियाने इन्स्टाग्राम पोस्टमध्ये लिहिलं की, मी जन्माने किंवा शरिराने महिला नव्हते, माझ्यात एक स्त्री होती. तिचं स्वप्न होतं की माझंही एक बाळ असावं आणि ते मला आई म्हणावं.

ट्रान्सजेंडर कपलने एका बाळाला दत्तक घेण्याची तयारी केली होती. याबाबत त्यांनी पूर्ण प्रक्रिया जाणून घेतली होती. पण कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्याचं त्यांच्यासमोर आव्हान होतं. ट्रान्सजेंडर कपल असल्यानं दोघांनाही ते अडचणीचं ठरल्याने अखेर त्यांनी निर्णय बदलला. ट्रान्सजेंडर कपलने एका बाळाला दत्तक घेण्याची तयारी केली होती. याबाबत त्यांनी पूर्ण प्रक्रिया जाणून घेतली होती. पण कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्याचं त्यांच्यासमोर आव्हान होतं. ट्रान्सजेंडर कपल असल्यानं दोघांनाही ते अडचणीचं ठरल्याने अखेर त्यांनी निर्णय बदलला.

---

# एकाच वेळी 55 मेंढ्यांचा मृत्यू

## मेंढ्यांच्या गूढ मृत्यूनं शेतकऱ्याला मोठा धक्का

।नवी दिल्ली। महाईन्यूज।



शेतकऱ्यांना नेहमीच विविध प्रकारच्या आपत्तींचा सामना करावा लागतो. पिकांचं नुकसान होणं, जनावरं दगावणं, कीड-रोगांमुळे पीक नष्ट होणं असे प्रकार कायम घडतात. साहजिकच या गोष्टींचा प्रतिकूल परिणाम शेतकऱ्याच्या आर्थिक स्थितीवर होतो. अशा प्रकारामुळे शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान सहन करावं लागतं. अलीकडच्या काळात वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात पाळीव जनावरांचा मृत्यू होण्याचं प्रमाण वाढलं आहे. बिबट्या, तरस आणि वाघाच्या हल्ल्यात पाळीव जनावरांचा मृत्यू झाल्याच्या घटना सातत्याने घडत आहेत. अशा घटनांमुळे शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका सहन करावा लागत आहे. वन विभागाने या संदर्भात उपाययोजना कराव्यात अशी मागणी शेतकरी वर्गाकडून होताना दिसते.

### दुर्ग जिल्ह्यातील घटना

» छत्तीसगडच्या दुर्ग जिल्ह्यात एका शेतकऱ्याच्या मालकीच्या 55 मेंढ्यांचा मृत्यू झाला आहे. मेंढ्यांच्या मृत्यूमागचं कारण अद्याप स्पष्ट झालेलं नाही. एवढ्या मोठ्या संख्येनं मेंढ्या मृत्युमुखी पडल्याने शेतकऱ्याला धक्का बसला आहे. ही घटना 1 फेब्रुवारीला रात्री उशिरा घडली. दुर्ग जिल्ह्यातल्या धमधा पोलीस स्टेशनच्या हद्दीतल्या धमधा आणि दारगावजवळच्या ठेंगा भाटा गावातल्या रतन धनकर या शेतकऱ्याने 55 मेंढ्या पाळल्या होत्या. रोजच्या सवयीनुसार तो संध्याकाळच्या वेळेस मेंढ्यांना पाहण्यासाठी गेला असता त्याला धक्कादायक चित्र दिसलं. अज्ञात कारणामुळे त्याच्या 55 मेंढ्यांचा मृत्यू झाला होता.मिळालेल्या माहितीनुसार, दारगाव परिसरात काही दिवसांपूर्वी एका तरसाचा वावर होता. या तरसाने गावातल्या काही जनावरांची एकाच वेळी शिकार केली होती. त्यामुळे या मेंढ्यांच्या मृत्यूसाठी वन्य प्राणी कारणीभूत आहे का हेदेखील तपासलं जात आहे.

# महिला आयपीएलचं बिगुल वाजलं!

## मुंबईच्या मैदानांवर रंगणार सामने, अंबानी vs अदानी कोणता संघ जिंकणार? चाहत्यांची उत्सुकता शिगेला

। अहमदाबाद ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**महिला प्रीमियर लीगच्या पहिल्या सत्राचा लिलाव सुपरहिट ठरणार आहे. प्रत्यक्षात, या लीगसाठी उपलब्ध असलेल्या ९० स्लॉटसाठी सुमारे १००० खेळाडूंनी नोंदणीसाठी स्वारस्य दाखवले आहे.**

महिला खेळाडूंमध्ये या लीगसाठी प्रचंड उत्साह आहे. न्यूज १८च्या वृत्तात, एका सूत्राने सांगितले की, 'महिला प्रीमियर लीगसाठी प्रचंड रस आहे. आतापर्यंत १००० खेळाडूंनी लिलावासाठी साइन अप केले आहे. या लिलावात भारतासोबतच परदेशी खेळाडूही मोठी उत्सुकता दाखवत आहेत. त्याच दरम्यान महिला आयपीएलचं बिगुल वाजलं आहे. मुंबईच्या मैदानावर हे सर्व सामने होणार आहेत.

मुकेश अंबानीच्या मुंबई इंडियन्सने ९१२ कोटींत मुंबई, रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने ९०१ कोटींत बंगळुरू, कॅप्री ग्लोबलने ७५७ कोटींत कोलकाता आणि JSW ग्रुपने ८१० कोटींत बंगळुरूचे हक्क जिंकले आहेत. महिला प्रीमिअर लीगसाठी बीसीसीआयने मागवलेल्या प्रसारण हक्काच्या बोलीत वायकॉम १८ ने डिझ्नी स्टार आणि सोनीला मागे टाकून पाच वर्षांसाठी ९५१ कोटींची सर्वाधिक बोली लावली. १३ फेब्रुवारीला WPL AUCTION होणार आहे. त्याआधी आज CRICBUZZ ने महिला प्रीमिअर लीगचे वेळापत्रक जाहीर केले. क्रिकबज वेबसाईटने दिलेल्या वृत्तानुसार महिला प्रीमिअर लीगची ४ मार्चला सुरुवात ही टीम मुंबई व टीम अहमदाबाद यांच्यातील



लढतीने होईल. म्हणजेच अंबानी विरुद्ध अदानी असा सामना रंगणार आहे. नवी मुंबईतील डी वाय पाटील स्टेडियमवर या लीगची सुरुवात होणार आहे आणि BCCI तशी आखणी करत आहे.

सीसीआय व डी वाय पाटील स्टेडियमवर ४ ते २६ मार्च या कालावधीत या लीगचे सामने खेळवले जातील. वानखेडे स्टेडियमवर १७ मार्चला भारत-ऑस्ट्रेलिया वन डे सामना होणार आहे आणि त्यामुळे येथे महिला प्रीमिअर लीगच्या लढती होणे अशक्य आहेत. त्यात १ एप्रिलपासून इंडियन प्रीमिअर लीगलाही सुरुवात होणार आहे. महिला प्रीमिअर लीगची दुसरी लढत टीम बंगळुरू विरुद्ध टीम दिल्ली अशी ५ मार्चला सीसीआयवर होण्याचा अंदाज व्यक्त केला गेला आहे. पाच संघांचा समावेश असलेल्या या लीगमध्ये एकच एलिमिनेटर सामना असेल. पाचपैकी तीन संघ प्ले ऑफमध्ये स्थान पक्के करतील. पहिल्या क्रमांकाचा संघ थेट फायनलमध्ये जाईल. तर दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकाच्या संघात एलिमिनेटरचा सामना होईल. एकूण २२ सामने खेळवले जातील.

### हे 5 संघ WPL च्या पहिल्या सत्रात दिसणार

**»नुकताच WPL साठी संघांचा लिलाव झाला. पहिल्या सत्रात ५ संघ खेळणार आहेत. अशा परिस्थितीत या ५ फ्रँचायझी खरेदी करण्यासाठी १७ कंपन्यांमध्ये स्पर्धा होती. येथे आयपीएलचे मुंबई इंडियन्स, रॉयल चॅलेंजर्स बंगलोर आणि दिल्ली कॅपिटल्स यांना प्रत्येकी एक संघ मिळाला. इतर दोन संघ अदानी स्पोर्टसलाइन प्रायव्हेट लिमिटेड आणि कॅप्री ग्लोबल होल्डिंग प्रायव्हेट लिमिटेड यांनी विकत घेतले. या ५ संघांची एकूण ४६७० कोटी रुपयांना विक्री झाली.**

### ही मूळ किंमत असू शकते

**» येथे, अनकॅप्ड खेळाडूंसाठी १० आणि २० लाख रुपयांची मूळ किंमत आणि कॅप्ड खेळाडूंसाठी ३०, ४० आणि ५० लाख रुपयांची मूळ किंमत असलेली श्रेणी तयार करण्याची माहिती आहे. महिला आयपीएलचा पहिला सीझन ४ ते २४ मार्च दरम्यान खेळवला जाण्याची शक्यता आहे.**

---

# जळी, स्थळी, काष्ठी पाषाणी' दिसे केवळ अश्विनची फिरकी!

## आव्हानाचा सामना करण्यासाठी ऑस्ट्रेलियाने घेतली त्याच्याच डुप्लिकेटची मदत

।ऑस्ट्रेलिया।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील बॉर्डर-गावसकर मालिका ९ फेब्रुवारीपासून सुरू होत आहे. या चार सामन्यांच्या कसोटी मालिकेसाठी दोन्ही संघांनी तयारी सुरू केली आहे. भारताच्या फिरकी खेळपट्ट्यांवर तयारी करण्यासाठी ऑस्ट्रेलियन संघ आठवडाभर अगोदर भारतात आला होता. कांगारू संघ बेंगळुरूच्या फिरकी खेळपट्टीवर सराव करत आहे. रविचंद्रन अश्विन आणि रवींद्र जडेजा कसोटी मालिकेत ऑस्ट्रेलियासाठी मोठा धोका बनू शकतात. अशा परिस्थितीत ऑस्ट्रेलियन संघ फिरकी गोलंदाजांना खेळवण्यासाठी विशेष तयारी करत आहे.

रविचंद्रन अश्विन हा जगातील सर्वोत्तम फिरकी गोलंदाजांपैकी एक हे. विशेषत: भारतीय खेळपट्ट्यांमध्ये त्याचे आकडे उत्कृष्ट आहेत. अश्विनला सामोरे जाण्यासाठी कांगारू संघ विशेष तयारी करत आहे. अश्विनचा डुप्लिकेट गोलंदाज महेश पिठियाला बेंगळुरूला बोलावण्यात आले असून तो ऑस्ट्रेलियन फलंदाजांना फिरकी गोलंदाजीचा सराव देत आहे. पिथियाची गोलंदाजी अश्विनच्या गोलंदाजीसारखीच आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, महेशची बॉलिंग ॲक्शन पाहून क्रिकेट ऑस्ट्रेलियाने त्याला बॉलिंगसाठी बंगळुरूला बोलावले आहे.

२१ वर्षीय महेशने गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये बडोद्याकडून प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये पदार्पण केले होते. तरुण फिरकीपटू अश्विनला मानतो आणि एक दिवस त्याला भेटण्याची आकांक्षा बाळगतो. त्याला भारतासाठी अश्विनसारखी जादू करायला नक्कीच आवडेल, पण सध्या ऑस्ट्रेलियन संघाने त्याला सरावासाठी बोलावले आहे. यामुळे त्याला आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळाली आहे. आगामी काळात तो कोणत्याही आयपीएल संघातही सहभागी होऊ शकतो.



### कांगारू करत आहेत फिरकी खेळपट्टीवर तयारी

**»ऑस्ट्रेलियन खेळाडूंचे म्हणणे आहे की, "सराव सामन्यांमध्ये बीसीसीआय त्यांना हिरव्या खेळपट्ट्या देते, ज्यामुळे फिरकी गोलंदाजांना मदत होत नाही आणि त्यांच्यासाठी फलंदाजी करणे सोपे होते, परंतु सामन्यांमध्ये फिरकी खेळपट्ट्या वापरल्या जातात. यामुळे त्याने या कसोटी मालिकेपूर्वी सराव सामने न खेळण्याचा निर्णय घेतला आहे. यानंतर, ऑस्ट्रेलियन संघ पूर्णपणे तुटलेल्या बेंगळुरूच्या जुन्या खेळपट्टीवर तयारी करत आहे. या तयारीमुळे त्यांना अश्विन आणि जडेजाचा कसोटी सामन्यात सामना करण्यास मदत होईल, अशी आशा ऑस्ट्रेलियाला असेल."**

---

# भारत - ऑस्ट्रेलिया कसोटी मालिका मोफत पाहता येणार

## BCCI ने घेतला मोठा निर्णय

। वेस्ट इंडीज । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात 9 फेब्रुवारीपासून 4 सामन्यांची कसोटी मालिका खेळवली जाणार आहे. या मालिकेसाठी दोन्ही संघांनी तयारीही सुरू केली आहे. दरम्यान मालिकेसाठी बीसीसीआयने मोठ निर्णय घेतला आहे.

करोडो क्रिकेट चाहत्यांना बीसीसीआयने आनंदाची बातमी दिली आहे. भारतीय चाहत्यांना आता दोन्ही संघांमध्ये खेळली जाणारी ही मालिका मोफत पाहता येणार आहे. त्याची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे.

भारत-ऑस्ट्रेलिया कसोटी मालिका स्टार स्पोर्ट्स तसेच डीडी स्पोर्ट्स फ्री टू एअर वाहिनीवर दाखवली जाईल. डीडी इंडियाने अधिकृतपणे पुष्टी केली आहे की तुम्ही 9 फेब्रुवारीपासून नागपुरात होणाऱ्या पहिल्या कसोटी सामन्याचे प्रसारण डीडी स्पोर्ट्सवर देखील पाहू शकाल.

### कसोटी मालिकेचं वेळापत्रक

- **» पहिली कसोटी, 9-13 फेब्रुवारी, नागपूर**
- **» दुसरी कसोटी, 17-21 फेब्रुवारी, नवी दिल्ली**
- **» तिसरी कसोटी, 1-5 मार्च, धर्मशाळा**
- **» चौथी कसोटी, 9-13 मार्च, अहमदाबाद**

